# मराठी विकिपीडिया

विकिपीडिया
मुक्त ज्ञानकोश

Access To Knowledge

## मराठी विकिपीडियन्स कडून "आपले हार्दिक स्वागत आहे."

"अशा जगाचे स्वप्न प्रत्यक्षात आणा कि जगातील हव्या त्या प्रत्येक भाषेतील ज्ञान, माहिती आणि संवाद मराठीत आणि मराठीतील माहीती, ज्ञान आणि संवाद जगातील प्रत्येक भाषेत तत्काळ आणि मुक्त पणे उपलब्ध होतील."

चला आपण सारे यामध्ये वाक्यातील काही निवडक जबाबदाऱ्या पेलण्यास सक्षम मराठी विकिपीडिया चळवळीत सहभागी होऊ या! जर हाडाचे मराठी प्रेमी असाल तर लागा कामाला आत्ता पासून या क्षणा पासून माय मराठीस द्या मिळवून तिच्या हक्काची जागा जी अढळ असेल जो पर्यंत हे अंतराळ आहे आणि त्यावर जीवन आहे तो पर्यंत वाटेतील सारे अडथळे केवळ मानसिक असतील आणि ते पार करण्याचे सामर्थ्य मराठी भाषा तुम्हा आम्हा सर्वांना सदोदीत देवो ही शुभेच्छा!!

### ❊ विकिपीडिया परिचय :

विकिपीडिया हा विकिपीडिया वाचकांनीच एकत्रितपणे इंटरनेट वर संपादित केलेला मुक्त ज्ञानकोश आहे. हे विकी वेबपेज आहे याचा अर्थ कुणीही अगदी तुम्हीसुध्दा ह्या वेबपेजची बहुतेक पाने किंवा लेख 'संपादन' असे लिहीलेल्या टॅबच्या चौकटीवर क्लिक करुन संपादनास सुरुवात करु शकता. संपादन म्हणजे नवे लेखन आणि जुन्या लेखनात सुधारणा.

इंग्रजी विकिपीडिया १५ जानेवारी २००१ ला सुरु झाला तर मराठी विकिपीडिया ची स्थापना १ मे २००३ ला झाली. मराठी जानणारे अनेकजण यास सक्रीय हातभार लावत आहेत.

❊ संकेतस्थळ : mr.wikipedia.org ❊

### विश्वकोश/ज्ञानकोश म्हणजे काय?

काही वेळा ज्ञानकोशासाठी विश्वकोश अशीही संज्ञा वापरली जाते. विश्वकोश म्हणजे ज्ञानाच्या सर्व शाखा किंवा विशिष्ट शाखेशी बहुव्यापक माहिती लिहीलेला बहुसमावेशक सारग्रंथ होय. विश्वकोश प्रत्येक विषयावर एक लेख या प्रमाणे विश्वकोशाची विविध लेखात नोंद घेते. एखाद्या विश्वकोषातील विषयासंबंधीत लेख, मजकुर किती आणी काय आहे. त्या नुसार एक पुस्तक किंवा त्यांच्या अनेक खंडात मांडणी केलेले आढळतात.

विश्वकोशांना स्वत:चा विशिष्ट वाचकवर्ग असतो. तो केवळ विश्वासार्ह, संक्षिप्त(मोजके) साक्षेपी(संदर्भ असलेली काही विरुध्द मते असल्यास, त्याच्या सह) शक्य तिथे संदर्भ असलेली वस्तुनिष्ठ आणि तटस्थपणे दिलेली माहिती वाचत असतो.